# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.03.2026** **वारःसोमवार**

---

•सबका साथ सबका विकास जनमानसाची आकांक्षापूर्ती वेबिनारमध्ये पंतप्रधानांचे आज संबोधन.
•अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात सभापती ओम बिर्ला यांच्यावरील अविश्वास प्रस्तावावर आज चर्चा
•साडेतीन वर्षांहून अधिक काळानंतर तेलाच्या किंमतीने पहिल्यांदाच ओलांडला प्रति पिंप १०० डॉलर्सचा टप्पा.
आणि
•टी ट्वेन्टी विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय संघाची सलग  दुसऱ्यांदा विश्वकरंडकाला गवसणी

पंप्र
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अर्थसंकल्पोत्तर सबका साथ सबका विकास- जनमानसाची आकांक्षापूर्ती या विषयावरील वेबिनारला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करणार आहेत. या विषयसूत्रांतर्गत शिक्षण आणि कौशल्य, आरोग्य आणि आयुष, पर्यटन आणि आदरातिथ्य यांसारख्या क्षेत्रांशी निगडीत विविध सत्रांचे आयोजन होईल. शिक्षण ते रोजगाराचे मार्ग, ॲनिमेशन विकास, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग आणि कॉमिक्स, ईशान्येकडील राज्यांमधील बौद्ध परंपरा आणि वारसा पर्यटन यांसारख्या उपक्रमांवर चर्चा होणार आहे. अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमुळे केंद्र सरकार, उद्योग आणि क्षेत्र तज्ज्ञ यांच्यादरम्यान अर्थसंकल्पात नमूद केलेल्या धोरणात्मक दृष्टीकोनाचे कृतीयोग्य धोरणांमध्ये रूपांतर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होईल.

**<u>संसदसत्र</u>**
संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून सुरू होणार असून, ते २ एप्रिलपर्यंत सुरू राहिल. लोकसभेत आज सभापती ओम बिर्ला यांच्यावरील अविश्वास ठराव मांडला जाणार आहे.  काँग्रेस सदस्य मोहम्मद जावेद, के. सुरेश आणि मल्लू रवी हा ठराव मांडतील. अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची मागणी  करणारा अविश्वास प्रस्ताव विरोधी पक्षांनी लोकसभेच्या महासचिवांना सादर केला होता. लोकसभेत, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर आखाती प्रदेशातील परिस्थितीबाबत निवेदन सादर करणार आहेत.  तर राज्यसभेत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या कामकाजावर चर्चा होणार आहे.

**<u>मायभारतयुवाकनेक्ट</u>**

दिल्लीत आज युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या विकसित भारत युवा कनेक्ट कार्यक्रमाचा दुसरा टप्पा सुरू होणार आहे. विकसित भारत २०४७ या दृष्टीकोनासह युवा सहभाग वाढवण्यासाठी मेरा युवा भारत, माय भारत या संकल्पनेच्या माध्यमातून हा उपक्रम आयोजित करण्यात येतो. राष्ट्रीय राजधानीतील ३५ महाविद्यालयांतील १० हजार विद्यार्थी यामध्ये सहभागी होण्याची अपेक्षा आहे. तरुण नागरिकांना देशाच्या विकास प्रवासाशी जोडून घेणे आणि राष्ट्रनिर्मितीतील त्यांच्या भूमिकेला प्रोत्साहन देण्यासाठी, परस्पर संवाद सत्रे आणि उपक्रमांचा यामध्ये समावेश आहे. विकसित भारत युवा नेतृत्व उपक्रमातील सादरकर्ते आणि विकसित भारत तरुण संसदेचे विजेते यांच्यासह तरुण आदर्श नेतृत्वदेखील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

**<u>भाजप</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या पश्चिम बंगाल भेटीदरम्यान तृणमूल काँग्रेस सरकारकडून शिष्टाचाराचे पालन न केल्याबद्दल आणि काल राज्यातल्या आंतरराष्ट्रीय संताल परिषदेच्या ठिकाणामध्ये अचानक बदल केल्याविषयी भाजपने टीएमसी सरकारवर टीका केली आहे. दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना भाजपचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी याचा निषेध करत, संविधान संकटात असल्याचा आरोप करणाऱ्या टीएमसीने आपल्या वर्तणुकीतून देशाच्या सर्वोच्च संवैधानिक अधिकारप्राप्त व्यक्तीच्या अधिकाराचा अनादर केला असल्याची जोरदार टीका केली.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>तेलकिंमत</u>**

इस्त्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मध्य पूर्वेतील तेल उत्पादन आणि तेल वाहतूकीवर अडथळा निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर साडेतीन वर्षांहून अधिक काळानंतर पहिल्यांदाच तेलाच्या किंमतीने १०० डॉलर्स प्रति बॅरलचा टप्पा ओलांडला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत होणाऱ्या तेलवाहतूकीवर या संघर्षाचा विपरित परिणाम झाला आहे. सौदी अरेबिया, कुवेत, इराक, कतार, बहरीन, संयुक्त अरब अमिराती आणि इराणमधून तेल आणि वायू निर्यातीसाठी ही सामुद्रधुनी एक महत्त्वाची मार्ग आहे.
दरम्यान, इराणची आण्विक क्षमता नष्ट झाल्यानंतर तेलाच्या किमती झपाट्याने कमी होतील, अमेरिकेची तसंच जागतिक सुरक्षा आणि शांततेसाठी तेलाच्या किंमतीतील वाढ ही एक लहानशी किंमत आपण मोजत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी ट्रुथ या समाजमाध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>आखातीप्रदेशउड्डाण</u>**

आखाती प्रदेशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे, अनेक क्षेत्रांमध्ये विमान वाहातूक सेवांवर परिणाम झाला आहे. प्रवाशांनी नव्या उड्डाण वेळांवर तसंच संबंधित विमान कंपन्यांनी या संदर्भात सामाईक केलेले संपर्क तपशीलांकडे लक्ष द्यावे असं आवाहन केलं आहे.

**<u>उड्डाण</u>**

नागरी विमान वाहातूक मंत्रालय आखाती प्रदेशातील हवाई उड्डाणांवर परिणाम करणाऱ्या परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहे. मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय विमान कंपन्या आज ५०

उड्डाणांचे नियोजन करणा आहेत. शनिवार, रविवारी देखील भारतीय विमान कंपन्यांनी अतिरिक्त विमान उड्डाणे चालवली होती. या सर्व तिकिटांचे दर वाजवी राहातील याची खात्री करण्यासाठीही विमान भाड्याचे निरीक्षण करण्यात येत असल्याचं निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>इराणसर्वोच्चनेता</u>**

इराणने अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर देशाच्या नव्या सर्वोच्च नेत्याची निवड केली आहे. मोजताबा खामेनी हे आपल्या वडिलांची जागा घेणार आहेत. अमेरिका-इस्रायल संयुक्त हल्ल्यात अयातुल्ला खामेनी यांना लक्ष्य करण्यात आले होते. दरम्यान, इस्रायलने इराणच्या कोणत्याही उत्तराधिकाऱ्याला लक्ष्य करण्यात येईल अशी धमकी दिली आहे. त्याचवेळी कालही संयुक्त अरब अमिरातीमध्ये अबू धाबीला लक्ष्य करणारे इराणी हल्ले सुरू होते. रात्री उशिरा इस्रायलने पुन्हा हल्ले केले. नागरी वस्ती असलेल्या भागातून तेहरान ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले करत असल्याने त्या ठिकाणांना लक्ष्य केले जात असल्याने इराणी नागरिकांनी घरातच थांबावं असे आवाहन अमेरिकन संरक्षण दलाने केले आहे.

**<u>नेपाळ-निवडणूक</u>**

नेपाळमध्ये काल झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने १६५ जागांपैकी १२२ जागांवर विजय मिळवला आहे. यामुळे पक्षाचे बालेंद्र शाह नेपाळचे पुढचे पंतप्रधान होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. निवडणूक आयोगाने आतापर्यंत १६५ जागांपैकी १५९ जागांचे निकाल जाहीर केले आहेत. मतमोजणी अद्याप सुरु आहे. गेल्या शनिवारी, ३५ वर्षीय शाह यांनी सीपीएन-यूएमएलचे अध्यक्ष आणि चार वेळा पंतप्रधान राहिलेले केपी शर्मा ओली यांचा सुमारे ५० हजार मतांनी पराभव केला आहे.

**<u>अमेरिका</u>**

उर्जा क्षेत्रातील जागतिक बाजारात स्थिरता राखण्याच्या उद्देशाने ट्रम्प प्रशासन जागतिक स्तरावरील तेल उत्पादक कंपन्या, ग्राहक आणि शुध्दीकरण सोबत काम करत आहे. असं प्रतिपादन अमेरिकेचे राजस्व मंत्री स्कॉट बेसेंट यांनी समाजमाध्यमावरील संदेशात केलं आहे. पश्चिम आशियातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर तेलपुरवठा साखळी विस्कळीत होऊ नये यासाठी हा संवाद एक सामुदायिक प्रयत्न असल्याचंही त्यांनी सांगितलं.

खुलीबॅडमिंटन-रात्री९चेबातमीपत्र-पूल-विजया (८.३७.३० पासून...)

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनला पुरुष एकेरीत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. अंतिम फेरीत त्याला लिन चुन यीकडून सरळ सेटमध्ये पराभव पत्करावा लागला.

**<u>इन्ट्रो:क्रिकेट</u>**

टी ट्वेन्टी विश्वकरंडकाच्या अंतिम सामन्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघातील धुरंधरांनी न्युझीलंडचा 96 धावांनी पराभव करत सलग दुसऱ्यांदा

विश्वचषकाला गवसणी घालत इतिहास रचला आहे. या विश्वजेतेपदाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, सचिन तेंडुलकर यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे....

**<u>स्क्रिप्ट</u>**:
न्यूझीलंड संघाचा कर्णधार मिचेल सँटनर याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.मात्र संजू सॅमसनच्या 89 , अभिषेक शर्माच्या 52 आणि ईशान किशनच्या 54 धावांच्या तसंच शेवटच्या षटकात शिवम दुबेने 8 चेंडूत 26 धावांचा दिलेला तडाखा या जोरावर भारताने 255 धावांचा डोंगर उभा केला.या स्पर्धेत उपांत्य आणि अंतिम सामन्यात अडीचशेपेक्षा जास्त धावा भारतीय संघाने केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना टीम सिफर्टच्या २६ चेंडूतील ५२ आणि मिचेल सँटनरंच्या ३५ चेंडूतील ४३ धावांची खेळी वगळता एकाही फलंदाजाला भारतीय गोलंदाजांसमोर तग धरता आला
नाही आणि न्यूझीलंडचा संघ १९ व्या षटकात १५९ धावांवर आटोपला. गोलंदाजीत जसप्रीत बूमराहनं सर्वाधिक ४ तर अक्षर पटेलनं ३ तर हार्दिक पांड्या, वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मानं प्रत्येकी एक बळी घेतला. जसप्रीत बुमराहला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. तर संजू सॅमसनला मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# **या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**